दैनिक
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
# महावृत्त
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक २६५ वा गुरूवार दि.१७ एप्रिल २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## लातुर जिल्हा पत्रकार स्वागत मंचच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

### क्रीडा व युवक कल्याण मा. मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी भेट दिली

लातुर :- दि १४ एप्रिल २०२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर १३४ जयंती निमित्त गांधी चौक येथे लातुर जिल्हा पत्रकार स्वागत मंच प्रथमच उभारण्यात आले होते यावेळी स्वागत मंचावरून लातूर शहरातील जयंती उत्सव मंडळांना शुभेच्छा देण्यात आल्या अत्यंत उत्साहवर्धक उत्साहित वातावरणात लातूर जिल्हा पत्रकार स्वागत मंचावर दयानंद जडे संपादक लातूर समाचार, नरसिंह घोणे,संपादक - शुभ दिन,दिपरत्न निलंगेकर दूरदर्शन प्रतिनिधी,अरुण समुद्रे दूरदर्शन प्रतिनिधी,दैनिक महाराष्ट्र टाइम्स ,हारुण सय्यद , ए एन आय प्रतिनिधी, अब्दुल समद शेख संपादक सा. मुस्लिम विकास परिषद , रघुनाथ बनसोडे संपादक- दैनिक लातूर प्रभात , महादेव कुंभार दैनिक देशोन्नती प्रतिनिधी, अभय मिरजकर - दैनिक सामना प्रतिनिधी , संगम कोटलवार संपादक सांज दैनिक सारथी समाचार, श्रीधर स्वामी संपादक दैनिक सत्यमत, त्र्यंबक कुभार संपादक दैनिक रत्नापूर समाचार , नेताजी जाधव संपादक एल टी एन न्यूज चैनल , सितम सोनवणे, संपादक माझं लातूर युट्युब चॅनेल अशोक हानवते संपादक दैनिक महावृत्त , पंडीत हाणमंते संपादक दैनिक साहित्य सम्राट महेद्र जोंधळे टीव्ही नाईन प्रतिनिधी , सुनिल कांबळे , अशोक देडे संपादक लातूर पॅटर्न न्यूज , विठ्ठलजी राऊत,संपादक सा. अतुल्य प्रितमजी सोनवणे यांची उपस्थिती होती डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एक महान विधिज्ञ, अर्थतज्ज्ञ, आणि समाजसुधारकच नव्हते, तर ते एक प्रतिभावंत पत्रकारही होते. पत्रकारितेच्या माध्यमातून त्यांनी शोषित, वंचित आणि दलित समाजाच्या प्रश्नांना वाचा फोडली. त्यांच्या पत्रकारितेचे मुख्य उद्दिष्ट सामाजिक जागृती, विषमतेविरोधी संघर्ष, आणि मानवमूल्यांचे संवर्धन होते. खाली त्यांच्या पत्रकारितेतील प्रमुख योगदान सविस्तर दिले आहे 'मूकनायक' १९२० स्थापन जानेवारी १९२० मध्ये डॉ. आंबेडकर यांच्या प्रेरणेतून ही साप्ताहिक वृत्तपत्र सुरू झाले. प्रत्यक्ष संपादक होते श्री. एन. शेलके. दलितांच्या सामाजिक, शैक्षणिक व राजकीय हक्कांसाठी आवाज उठवणे. हे पहिलेच अशा प्रकारचे वृत्तपत्र होते ज्याने अस्पृश्यतेविरुद्ध ठाम भूमिका घेतली. 'मूक' असलेल्या लोकांचा 'नायक' बनण्याचा







हेतू यातून दिसून येतो.'बहिष्कृत भारत' १९२७ स्थापन ३ एप्रिल १९२७ स्वतः डॉ. आंबेडकर हे संपादक होते. बहिष्कृत वर्गासाठी सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक प्रबोधन करणे.त्यात त्यांनी धर्म, जात, अर्थव्यवस्था आणि राजकारण यावर सखोल लेख लिहिले. 'जनता' १९३० स्थापन २४ नोव्हेंबर १९३० 'बहिष्कृत भारत'चेच पुढचे रूप. दलित चळवळीला अधिक व्यापक मंच देणे. 'जनता' हेच पुढे 'प्रबुद्ध भारत' या नावाने ओळखले जाऊ लागले. 'प्रबुद्ध भारत' १९५६ स्थापन: ४ फेब्रुवारी १९५६ नवबौद्ध चळवळीचे प्रचारमाध्यम. बौद्ध धर्माचा प्रसार, मानवता व समता यांचे मूल्य समाजात रुजवण्याचा प्रयत्न. डॉ. आंबेडकर यांच्या पत्रकारितेची वैशिष्ट्ये समाजप्रबोधन शिक्षण, हक्क, समता, धर्मसुधारणा या विषयांवर त्यांची लेखनशैली प्रभावी होती. तथ्याधिष्ठित विचार: त्यांच्या लेखनात तथ्यांचा आधार असतो. कुठलाही मुद्दा मांडताना त्याचा ऐतिहासिक, सामाजिक व वैचारिक संदर्भ स्पष्ट केला जातो. क्रांतिकारक दृष्टिकोन त्यांची पत्रकारिता ही क्रांतिकारी होती. त्यांनी शब्दांनीच समाजात नवा विचारव्यूह तयार केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पत्रकारितेतील योगदान हे सामाजिक क्रांतीचे एक प्रभावी माध्यम होते. त्यांनी केवळ शब्दांमधून नव्हे, तर विचारांमधून एक प्रबुद्ध समाज घडवण्यासाठी आपले जीवन झोकून दिले. होते त्यांचे पत्रकारीता मधील योगदान डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती १४ एप्रिल २०२५ रोजी १३४ वी जयंती दरवर्षी प्रमाणे याही वर्षीत साजरी करण्यात आली भारतातील सर्वात महत्त्वाच्या सामाजिक सुधारकांपैकी एक असलेल्या डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी साजरी केली जाते. देशभरात सकाळी प्रभातफे-या काढण्यात आली ज्यामध्ये बँड, घोषवाक्ये आणि डॉ. बाबासाहेबांचे विचार सांगणारे फलक तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे भीमसैनिक जनसमुदाय उपस्थित होता पुतळ्याला फोटो पुष्पहार अर्पण करण्यात आले शाळा, महाविद्यालयं, आणि सामाजिक संघटना यांच्यामार्फत विशेष कार्यक्रम, वक्तृत्व स्पर्धा, परिसंवाद आयोजित केले होते डॉ. आंबेडकरांचे विचार प्रचार त्यांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी पुस्तकांचे वितरण, चर्चा सत्रं आयोजित केले होते रक्तदान शिबीर, अन्नदान, वंचितांसाठी मदत अशा उपक्रमांचं आयोजन केलं होतं शिकून घ्या, संघटित व्हा, आणि संघर्ष करा.माझं आयुष्य म्हणजे शिक्षणासाठीचा लढा आहे. कायद्याने जे मिळवता येतं ते कधीही बळाने मिळवू नका. अत्यंत उत्साहवर्धक आनंदात जयंती साजरी करण्यात आली

## भिवंडीतील यंत्रमाग कामगाराचा मुलगा झाला न्यायाधीश



ठाणे भिवंडी :- भिवंडीतील यंत्रमाग कामगारांचा मुलगा रमेश आढागळे यांनी स्पर्धा परीक्षेत यश संपादन केले २०२२ साली न्यायाधीश पदाच्या १३१ जागा भरण्याकरिता आयोगाच्या जाहिरातीनुसार परीक्षा घेण्यात आली त्यात १० हजार जणांनी परीक्षा दिली त्यात १ हजार २०० जण परीक्षेत पात्र ठरले होते त्यातील ३४१ जणांची मुलाखत घेऊन १३१ जणांची निवड करण्यात आली त्यात एड रमेश आडागळे यांची ४१ व्या क्रमांकानी दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्थर व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग म्हणून निवड झाल्याने समाजभूषण मा.उत्तमराव दासू तरकसे (महाराष्ट्र शासनाच्या समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी साहित्यिक विचारवंत) यांनी नवप्रविष्ट न्यायाधीश रमेश आडागळे यांच्या भिवंडी येथील निवासस्थानी जाऊन न्यायाधीश साहेबांच्या पूर्ण परिवाराची भेट घेऊन सर्व परिवारासोबत आनंद साजरा करत न्यायाधीश साहेब व त्यांच्या पत्नी सौ स्नेहा असे दोघांचे अभिनंदन करत त्यांना त्यांच्या पुढील यशाच्या वाटचाली करिता भरभरून मंगलमय शुभेच्छा देत निळ्या शालिनी पुष्पगुच्छ देऊन न्यायाधीश परिवारांचा सन्मान केला

तसे हे कुटुंब मूळचे बीड जिल्ह्यातील धारूर तालुका तालुक्यातील आसरडोह हे दुष्काळी गाव असल्याने कुटुंबाच्या उदरनिर्वाह करिता १९९८ साली त्यांचे वडील वसंत आढागळे हे ठाणे जिल्ह्यातील भिवंडी येथे यंत्र कामगार म्हणून काम करत भिवंडीत स्थायिक होऊन मुलांचे शिक्षण पूर्ण करत सदर परिवाराने हे यश संपादन केले आहे म्हणून एकूण आढागळे परिवाराचे व न्यायाधीश साहेबांची उत्तरोत्तर प्रगती होत राहो त्यातच देशाचे राष्ट्राची व समाजाची सुद्धा प्रगती होऊ अशी अपेक्षा समाजभूषण मा.उत्तमराव तरकसे यांनी आढागळे परिवाराकडे व्यक्त केली

## उपसरपंचाचा १६ वर्षीय मुलीवर बलात्कार

नांदेड : नांदेडमध्ये एक भयंकर घटना समोर आली आहे. उपसरपंचानेच १६ वर्षांच्या अल्पवयीन तरुणीवर बलात्कार केला आहे. या घटनेनंतर अल्पवयीन मुलगी गर्भवती राहिली होती. या घटनेने परिसरात एकच संताप व्यक्त करण्यात येत आहे. पोलिसांनी आरोपी उपसरपंचाला ताब्यात घेतले असून पुढील तपास करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुणीचे वय १६ वर्षे असून आरोपीचे वय ५५ वर्षे आहे. आरोपी हा उपसरपंच आहे. आरोपीने लैंगिक अत्याचार केल्यानंतर तरुणी गर्भवती राहिली होती. त्यानंतर तिने नऊ महिन्यांनी मुलीला जन्म दिला. मुलीच्या जन्मानंतर आरोपीने ते बाळ विकल्याचा संशय आहे. तामसा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील ही घटना असून पोलिस त्या दिशेने तपास करत आहेत.

आरोपी बाबूराव तुपेकर याने वर्षभरापूर्वी गावातीलच एका अल्पवयीन मुलीला गुंगीच्या गोळ्या खाऊ घालून लैंगिक अत्याचार केला. मुलगी गर्भवती राहिली आणि महिनाभरापूर्वी तिची प्रसूती करण्यात आली. पीडित मुलीने जन्म दिलेल्या बाळाला विकल्याचा संशय आहे. हे



प्रकरण दडपण्याचा प्रयत्न झाला. या प्रकरणी तामसा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी उपसरपंच बाबूराव तुपेकर याला अटक करण्यात आली असून पुढील तपास पोलिस करत आहेत.

## लातूर शहरात स्वच्छ पाणीपुरवठा करावा नळाला पिवळे पाणी येत असल्याच्या तक्रारीनंतर माजी मंत्री आ. अमित देशमुख यांनी मनपात जाऊन घेतली आढावा बैठक

लातूर / प्रतिनिधी :- अद्यावत तंत्रज्ञान आणि तंत्रज्ञांची मदत घेऊन पाण्याचे योग्य पद्धतीने शुद्धीकरण करून लातूर शहरात स्वच्छ पाणीपुरवठा करावा, अशा सूचना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर महानगरपालिकेतील आढावा बैठकीदरम्यान केल्या आहेत. लातूर शहरात नळाद्वारे गढूळ आणि पिवळे पाणी वितरित होत असल्याच्या नागरिकाकडून येत असलेल्या तक्रारीची दखल घेऊन माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बुधवार दि. १६ एप्रिल २०२५ रोजी सकाळी खासदार मा.डॉ.शिवाजी काळगे यांच्यासह महानगरपालिकेत जाऊन आयुक्त, उपायुक्त, नगर अभियंता, पाणीपुरवठा विभागाचे संबंधित अधिकारी यांची आढावा बैठक घेतली, सदरील आढावा बैठकीच्या प्रारंभी आमदार अमित विलासराव देशमुख यांनी धरणातील पाण्याची उपलब्धता, पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक यासंदर्भात माहिती घेतल्यानंतर, पिवळे पाणी वितरित होण्याबाबतच्या कारणांची माहिती जाणून घेतली, धरणातील पाणी शेतीसाठी कॅनॉलद्वारे सोडल्यानंतर, पाण्यात मोठ्या हालचाली होऊन, शेवाळे वरच्या बाजूला येतात, या शेवाळ्यांचा तीव्र उन्हाशी संपर्क आल्यानंतर, शेवाळ्याचा रंग पाण्यात उतरत असल्याचे बैठकीदरम्यान सांगण्यात आले, पाण्याचा रंग पिवळा पडत असला तरी ते पिण्यास योग्य असल्याचा खुलासाही महापालिका प्रशासनाकडून यावेळी करण्यात आला. नळाला गढूळ आणि पिवळे पाणी येणे ही अत्यंत गंभीर बाब आहे, त्यात तातडीने सुधारणा करावी, आवश्यक त्या तंत्रज्ञानाची उपलब्धता करावी, कोणत्याही परिस्थितीत यापुढे असे पाणी वितरित होणार नाही याची दक्षता घ्यावी, अशा सक्त सूचना आमदार अमित विलासराव देशमुख यांनी यावेळी संबंधितांना दिल्या आहेत, पिवळे पडत असलेले पाणी पिण्यास योग्य आहे असा महापालिका अधिकाऱ्यांचा दावा असला तरी, नागरिक हे पाणी पिण्यास धजावत नाहीत त्यामुळे सर्व प्रकारच्या उपयोजना करून स्वच्छ पाणीपुरवठा करावा असे निर्देश आमदार देशमुख यांनी यावेळी दिले. फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी करावी लातूर महानगरपालिकेत यापूर्वीच मंजूर करण्यात आलेल्या फेरीवाला धोरणाची तातडीने अंमलबजावणी करावी, हातगाड्यावरून वस्तू विकणारे, त्याचबरोबर फळे आणि भाजीपाला विकणाऱ्यांना तातडीने जागा निश्चित करून देण्यात याव्यात अशी सूचनाही त्यांनी यावेळी केली. महात्मा बसवेश्वर पुतळा चबुतऱ्यांचे त्वरित नव्याने दर्जेदार बांधकाम करावे महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्याच्या चबुतऱ्याचे सुशोभीकरण करण्याच्या सूचना यापूर्वीच दिल्या आहेत त्याची अद्याप अंमलबजावणी झालेली नाही ती तातडीने करावी, शहराच्या कण्हेरी भागातील लिंगायत स्मशानभूमीचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, या संदर्भातील न्यायालयाचा आदेश, आणि लिंगायत समाजाच्या शिष्टमंडळाची भूमिका लक्षात घेऊन यातून सामोपचाराचा मार्ग काढावा अशी सूचनाही आमदार देशमुख यांनी यावेळी केली. शहरातील खाजगी रुग्णालयाचे प्रश्न तातडीने मार्गी लावावे लातूर शहरातील खाजगी रुग्णालयाच्या उभारणीत आणि नंतर रुग्णालयांना परवाना देण्यात महापालिकेकडून येत असलेल्या अडचणी संदर्भात इंडियन मेडिकल असोसिएशनने दिलेल्या निवेदनासंदर्भात त्वरित कार्यवाही करावी,





इतर महानगरातील नियमावली लक्षात घेऊन, समस्या सोडवण्याच्या दृष्टीने महापालिका प्रशासनाचे कार्यवाही करावी असे आमदार देशमुख यांनी यावेळी सांगितले. सर्वंकष विकास आराखडा तयार करून टप्प्याटप्प्याने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क विकसित करावे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क विकासाचा सर्वंकष आराखडा तयार करण्याच्या यापूर्वीच सूचना दिल्या आहेत, हा आराखडा त्वरित तयार करावा, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा भव्य दिव्य पुतळा बनवण्याची जबाबदारी महाराष्ट्र भूषण राम सुतार यांच्याकडे सोपवावी, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा पुतळा, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याशेजारी उभारावा, हुतात्मा स्मारक, मराठवाडा मुक्ती संग्राम स्मारक, छत्रपती शिवाजी महाराज वाचनालय, मिनी मार्केट मधील दुकानासाठी स्वतंत्र कॉम्प्लेक्स या व ईतर सर्व आवश्यक्य सोयी सुविधांसह हा विकास आराखडा तयार करण्यात यावा व त्याची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करावी अशी सूचनाही त्यांनी केली. नवीन रेणापूर नाका परिसरात नाल्याचे पाणी थांबून निर्माण होत असलेल्या अडचणींची सक्षम अधिकाऱ्याने जाऊन तातडीने पाहणी करावी आणि ती समस्या सोडवावी, नागरिकांच्या तक्रारीची तातडीने दखल घ्यावी, शहरात घंटागाडी कार्यक्षमतेने काम करील याची दक्षता घ्यावी, शहरातील विविध विकास योजनांची कामे दर्जेदार पद्धतीनेच व्हावीत, यात असंवैधानिक लोकांचा हस्तक्षेप खपवून घेऊ नये आदि सूचनाही या बैठकीदरम्यान माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केल्या आहेत. या आढावा बैठकीस महापालिका आयुक्त देविदास जाधव उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, पाणीपुरवठा विभागाचे शहर अभियंता विजयकुमार चव्हाण मुख्य लेखापरीक्षक कांचन तावडे, मुख्य लेखाधिकारी रावसाहेब कोलगाने, जनसंपर्क अधिकारी रुक्मानंद वडगावे नागरिकांच्या शिष्टमंडळाच्या वतीने माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे, लातूर आयएमए प्रतिनिधी डॉ. सतीश देशमुख लिंगायत समाज शिष्टमंडळ प्रमुख बसवंतआप्पा भरडे, फेरीवाला समितीचे अध्यक्ष गौस गोलंदाज, नवीन रेनापुर नाका परिसरातील नागरिकांच्या वतीने विष्णुदास धायगुडे आदिसह संबंधित विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# संपादकीय

## भाजपचे ‘ऑपरेशन तामिळनाडू’

भाजपने अण्णा द्रमुकशी युती करत तामिळनाडू विधानसभा निवडणुकीची जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. द्रमुकची सत्ता उखडून फेकून देण्याचा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला आहे, तर केंद्राच्या धोरणांना थेट विरोध करत द्रमुकने भाजपविरोधी आघाडी उघडल्याने राजकीय संघर्ष उफाळणार आहे. भाजपसोबतची युती दोनच वर्षांपूर्वी तोडणार्या आणि आम्ही भविष्यात भाजपसोबत काम करणार नाही, अशी स्पष्ट भूमिका घेणार्या अण्णा द्रमुक पक्षाशी नव्याने बाशिंग बांधत भाजपने तामिळनाडूत दक्षिण विजयासाठी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. मुख्यमंत्री स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखालील द्रमुक सरकारला हटवण्याचा आणि दक्षिणेतील राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या राज्यात कमळ फुलवण्याचा अजेंडा भाजपने हाती घेतला असून अण्णा द्रमुकशी समझोता करत निवडणूक आघाडीवर पहिल्या टप्प्यातील मोठे यश मिळवले आहे. तामिळनाडूत अण्णा द्रमुक आणि भाजपचे संबंध आजवर नरम-गरम राहिले आहेत. भाजपचे हिंदुत्ववादाचे आणि अण्णा द्रमुकचे तामिळींचा कळवळा असणारे, अल्पसंख्याकांना सोबत घेण्याचे सर्वसमावेशक राजकारण यावरूनच या पक्षांतील युती फिसकटली होती. अण्णा द्रमुकचे नेतृत्व जयललिता यांच्याकडे जोपर्यंत होते तोपर्यंत त्यांच्याशी युती करून भाजपने या राज्यात बर्यापैकी हातपाय पसरले.

विशेषत: १९९८ च्या लोकसभा निवडणुकीत चांगले यश मिळवल्याने अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली एनडीएचे सरकार केंद्रात स्थापन करण्यात जयललिता यांनी महत्त्वाची भूमिका बजावली खरी; पण पुढच्याच वर्षी भाजपने मागण्या नाकारल्याचे कारण पुढे करीत त्यांनी सरकारचा पाठिंबा मागे घेतल्याने ते कोसळले. पुढच्या दोन निवडणुकांत हे दोन्ही पक्ष एकत्र येऊ शकले नाहीत; मात्र २०१९ च्या निवडणुकीत ते पुन्हा एक झाले. गेल्या २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत या आघाडीने द्रमुकशी चांगली लढत देऊनही सत्ता स्थापन करता आली नाही. त्यानंतर मात्र दोन्ही पक्षांतील दरी वाढत गेली. राज्यात पक्ष विस्ताराची मोठी जबाबदारी असलेले प्रदेशाध्यक्ष अण्णामलाई यांनी आक्रमक भूमिका घेताना अण्णा द्रमुक सरकारच्या काळातील काही निर्णयांवर विरोधाची भूमिका घेतली. जयललिता यांच्यावर टीका केली. स्थानिक अल्पसंख्याक मतपेढी हरवण्याच्या भीतीपोटी दोन वर्षांपूर्वी अण्णा द्रमुकने भाजपशी युती तोडली. आता नव्याने साकारलेल्या युतीला ही पार्श्वभूमी आहे. भाजपने जुन्या मतभेदांवर पडदा टाकला आणि नव्या दमाने ‘ऑपरेशन तामिळनाडू’ सुरू केले आहे. ते करताना अण्णा द्रमुकच्या दबावापुढे झुकत युतीत अडथळा ठरणारे प्रदेशाध्यक्ष अण्णामलाई यांना हटवण्यात आले. दक्षिणेशी जोडण्याचा भक्कम पूल म्हणून भाजप या युतीकडे पाहते. अर्थात, पक्षाकडे स्वबळाची ताकद नाही आणि दुसरा पर्यायही नाही, हेही वास्तव!

या नव्या युतीचा मुख्य स्पर्धक आहे तो सत्ताधारी द्रमुक. त्याच्याशी लढण्यासाठी अण्णा द्रमुकलाही भाजपसारख्या बलाढ्य पक्षाची साथ हवी होती. लोकसभा निवडणुकीत या दोन्ही पक्षांचा दारूण पराभव झाला होता. द्रमुकच्या नेतृत्वाखालील इंडिया आघाडीने सर्व ३९ जागा, तर काँग्रेसने ९ जागा मिळवल्या होत्या. विधानसभेतही सत्तारूढ द्रमुक आघाडीकडे १५९ आमदारांचे स्पष्ट बहुमत (एकूण जागा २३४) आहे, तर विरोधी एनडीएकडे ७५ जागा आहेत. सत्ताधारी प्रमुख पक्षांपैकी द्रमुक १३२, काँग्रेस १७, विरोधी अण्णा द्रमुक ६२, भाजप ४ हे बलाबल लक्षात घेता सत्तेसाठी किमान ११८ जागा खेचून आणण्याची ही लढाई भाजप युतीसाठी वाटते तितकी सोपी नाही. त्याचमुळे झालेली चूक दुरुस्त करण्याचा प्रयत्न भाजपने चालवला आहे. भाजपचा हिंदुत्ववादी चेहरा, चौफेर विकासाचा दावा, उत्तर तामिळनाडूच्या भागात पसरलेला नवमतदार, ग्रामीण भागावर असलेली अण्णा द्रमुक पक्षाची मजबूत पकड याची गोळाबेरीज करण्याची रणनीती भाजपने आखलेली दिसते. पक्षाची भिस्त अण्णा द्रमुकवरच असल्याने त्या पक्ष नेत्यांच्या तालावर नाचण्याशिवाय पक्षासमोर पर्याय नाही.

भाजपचा प्रदेशाध्यक्ष बदलण्यास भाग पाडून आणि नंतर निवडणुकीची सर्व सूत्रे स्वतःकडे घेऊन अण्णा द्रमुकने आधीच आपला मार्ग प्रशस्त करून घेतला आहे. आता खरा प्रश्न आहे तो, हा मेळ घालणार कसा? सत्ताधारी द्रमुकने तामिळींच्या भावनांना हात घालत हिंदी भाषेला विरोधाचा आणि अस्मितेचा मुद्दा पुढे केला आहे. अण्णा द्रमुकची भाजपशी युतीमागील भूमिका राष्ट्राच्या मुख्य प्रवाहाशी आणि त्यायोगे केंद्रातील सत्तेशी जोडले जाण्याची आहे. भाजपला डबल इंजिन सरकारचा प्रयोग इथेही करायचा आहे. मुख्य इंजिन अण्णा द्रमुकचेच राहणार यात वाद नाही. अण्णा द्रमुकच्या मतांची टक्केवारी २५ ते ३० टक्क्यांच्या आसपास आहे, तर भाजपकडे केवळ चार ते पाच टक्के हक्काचा मतदार आहे. युतीचे नेतृत्व अण्णा द्रमुकचे नेते, माजी मुख्यमंत्री के. पलानीस्वामी यांच्यावर सोपवून भाजपने संभाव्य दगाफटका टाळण्याचा प्रयत्न केला आहे.

दोघांचा समान शत्रू द्रमुक असल्याने ही आघाडी नेटाने काम करेल, असे दिसते. द्रमुकच्या मतांत फूट पाडण्यासाठी भाजप आणखी कोणता पर्याय उभा करतो, हे पाहावे लागेल. या स्थितीत मतदारांसमोरही दोन सशक्त पर्याय उभे राहताना दिसतात. भाजप अधिक अण्णा द्रमुक मतांची बेरीज, पंतप्रधान मोदी आणि अमित शहा यांच्या ‘विकासयात्रे’चा प्रभाव पडला, तरच द्रमुक समोर मोठे आव्हान निर्माण करण्यात या नव्या युतीला यश येईल. दुसरा पर्याय अर्थातच द्रमुकचा आहे.

लहान भावाच्या भूमिकेत असलेल्या भाजपला मोठा पल्ला गाठावा लागणार आहे. विधानसभेतील केवळ ४ जागा, मतांचा अल्पआधार, हिंदुत्ववादी वैचारिक भूमिका रुजवण्याचा अवघड प्रयोग हे अडथळे पार करत पक्ष निवडणुकीला सामोरा जात आहे. पंतप्रधान मोदी आणि युतीचे शिल्पकार अमित शहा यांच्यावरच विजयश्री खेचून आणण्याची मुख्य जबाबदारी आहे. पंतप्रधान मोदी यांनी गेल्याच आठवड्यात ८ हजार ३०० कोटींच्या विकास प्रकल्पाचे लोकार्पण करीत निवडणुकीचे रणशिंग फुंकले. त्यांची भाषा विकासाची आहे. ‘द्रमुकला सत्तेतून उखडून फेकू. निवडणुकीनंतर द्रमुकचे अस्तित्व संपेल’ हा त्यांनी व्यक्त केलेला विश्वास किती खरा ठरतो, हे पाहावे लागेल. चिवट आणि प्रखर विरोध करत हा राष्ट्रीय हल्ला परतविण्याची मोठी तयारी द्रमुक नेत्यांनीही केली आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रधानमंत्री झाले असते तर?

(भिमराव परघरमोल)

भारताच्या इतिहासाविषयी अनेक विद्वानांमध्ये चर्चा होताना दिसतात.त्यापैकी महत्त्वपूर्ण म्हणजे, स्वतंत्र भारताच्या प्रथम प्रधानमंत्र्याविषयीची.पंडित जवाहरलाल नेहरू ऐवजी जर भारताचे प्रधानमंत्री सरदार वल्लभभाई पटेल झाले असते तर? या विषयावर अनेकांची मतेमतांतरे वाचायला तथा ऐकायला मिळतात.काहींच्या मते सरदार वल्लभभाई पटेल यांची पक्ष बैठकी अंतर्गत बहुमताने निवड झालेली होती. ते पोलादी पुरुष होते.ते जर भारताचे प्रधानमंत्री झाले असते तर भारताचा इतिहास काही वेगळाच असता.त्यांच्या या चर्चेमध्ये तथ्य असेलही कदाचित! परंतु तरीही ते स्वतंत्र भारताचे प्रथम उपप्रधानमंत्री व देशाचे गृहमंत्री होतेच,यात तीळमात्र शंका नाही.तसेच ते स्वतंत्र भारताच्या प्रथम सार्वत्रिक निवडणुका होण्याआधीच म्हणजे १५ डिसेंबर १९५० रोजीच निवर्तले.




परंतु त्या उभयंताऐवजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जर देशाचे प्रधानमंत्री झाले असते तर? अशी चर्चा मात्र फारशी होताना दिसत नाही. आणि ते साहजिकही आहे. कारण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शेड्युलड् कास्ट फेडरेशन या पक्षाचे बलाबल हे फार कमी,म्हणजे नसल्यागत होते. १९४५ च्या प्रांतिक निवडणुकांमध्ये त्यांच्या पक्षाला नगन्य यश मिळाल्यामुळे संविधान सभेची दारं,खिडक्या आणि तावधानंही त्यांच्यासाठी बंद होती.तरीही ते पश्चिम बंगालमधील सामान्य मतदार संघातून स्वतंत्र उमेदवार म्हणून सर्वात जास्त मतांनी संविधान सभेवर निर्वाचित झाले.९ डिसेंबर १९४६ ते ३ जून १९४७ पर्यंत,म्हणजे संविधान सभेची प्रथम बैठक ते भारत पाकिस्तान फाळणी जाहीर होईपर्यंत त्यांनी संविधान सभेवर केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांचे रद्द झालेले सदस्यत्व काँग्रेस पक्षाने मुंबई सामान्य मधून त्यांना पुन्हा बहाल केले. संविधान सभेवर त्यांची फेरनिवडणच नाही,तर प्रथम मसुदा समितीवर व नंतर तिच्या अध्यक्षपदीही त्यांची वर्णी लागली. त्यानंतर संविधान सभेतील विविध समित्यांमधील त्यांचे कार्य व संविधान निर्मितीतील योगदान हे आता दडून राहिलेले नाही. त्याचा इतिहास हा संविधान सभा चर्चासत्रे (उेपीींर्ळीशपीं –ीशालश्रू उ्शलरींशी) म्हणून खंड रूपाने हजारो पानांचा दस्तावेज प्रकाशित झाला आहे.

१९४७ ते १९५२ पर्यंत म्हणजेच देश स्वतंत्र झाल्यापासून तर प्रथम सार्वत्रिक निवडणुका होई पर्यंत पंडित जवाहरलाल नेहरू हे भारताचे (ड्ढश्रशलींश्व,छीं एश्रशलींश्व) स्वीकारलेले प्रधानमंत्री होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांसह बिगर काँग्रेसी पाच लोक त्यांच्या मंत्रिमंडळात होते.सत्तेतील शक्ती त्यांची कमी असली तरी त्यांचा अभ्यास, चळवळ आणि चिंतनातून उदयाला आलेली त्यांची विद्वत्ता ही शेकडोंची बराबरी करणारी होती. त्यामुळेच त्यांना स्वातंत्र्यपूर्व भारतात म्हणजे १९४२ ते १९४६ पर्यंत व्हाईसरॉयच्या केंद्रीय मंत्रिमंडळात श्रम,जल,ऊर्जा व बांधकाम अशा एक नवे तर तब्बल चार खात्यांचे मंत्रीपद सन्मानाने मिळाले होते. त्या खात्यांवर त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय आहे. आजही ते दखलपात्र तथा दिशादर्शक ठरत आहे. तसे त्याचे पुरावेही उपलब्ध आहेत.

१९१८ साली त्यांनी ’स्मॉल होल्डिंग इन इंडिया अँड देयर रेमेडीज’ नावाचे पुस्तक लिहून भारतातील शेतकर्‍यांच्या विकासास्तव सरकारला विशेष मार्गदर्शन करण्याचं महत्कार्य केलेलं आहे. शेतकऱ्यांच्या आजच्या आत्महत्यांचे मूळ त्या पुस्तकात दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९४३ ला अर्थतज्ज्ञांच्या चौथ्या बैठकीत त्यापुढील विचार व्यक्त केलेले दिसतात. ते म्हणतात की, शेती हा आजचा मुख्य व्यवसाय आहे व तो दीर्घकाळ चालू राहणार आहे. शेतीचे उत्पन्न वाढविण्यासाठी शेती फायदेशीर होणे आवश्यक आहे.त्यासाठी त्यावरील लोकसंख्येचा भार कमी करून त्यावर भांडवली गुंतवणूक वाढविणे आवश्यक आहे. उद्योगांचा सर्वांगीण विकास करणे महत्त्वाचे आहे. वाढत्या औद्योगीकरणांमध्ये शेती व उद्योगांचा समतोल विकास होईल, शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी झाल्यामुळे शेतीचा आकार वाढेल. त्यातून दरडोई उत्पन्न वाढेल, बचत वाढेल,गुंतवणूक वाढेल व शेवटी ग्रामीण भागाचा विकास होऊन त्यांचेही दरडोई उत्पन्न वाढेल. यासाठी मूलभूत सेवा सुविधांचा विकास जसे की, विद्युतशक्ती,दळणवळण,जलव्यवस्थापन,वाहतूक सुविधा आणि तांत्रिक मनुष्यबळ ह्या गोष्टी औद्योगीकरणासाठी महत्त्वाच्या आहेत.म्हणून त्यांना प्राधान्य दिले पाहिजे. असे त्यांचे मत होते.औद्योगीकरणाचा प्रयत्न यशस्वी होण्यासाठी स्वस्त व मुबलक विद्युत यावर त्यांचा भर होता.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जलसंपत्ती आणि जलसंवर्धन याविषयी अनेक ठिकाणी आपले विचार व्यक्त केलेले आहेत.त्यांच्या मते मनुष्याला अतिरिक्त पाण्यापेक्षा त्याच्या अभावामुळे अधिक त्रास होतो.म्हणून त्यांनी महापूर येणाऱ्या नद्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याचा प्रयत्न केला.पुराच्या पाण्याचे नियोजन करण्यासाठी दामोदर खोरे प्रकल्प, सोन नदी प्रकल्प,हीराकुंड प्रकल्प इत्यादींची पायाभरणी केली. त्यामधून फक्त पुराच्या पाण्याचे नियोजन करणे एवढाच त्याचा मर्यादित उद्देश नव्हता,तर त्यातून जलसिंचन,जलविद्युत,जलवाहतूक (नौकानयन) इत्यादीची तरतूद होती.अमेरिकेमध्ये महापूर येणाऱ्या नद्यांचे पाणी धरण बांधून अडवले जाते ते दुसऱ्या जलाशयामध्ये बळवून त्यावर सिंचन,विद्युत निर्मिती,जलवाहतूक असे बहुउद्देशीय वापर ते करतात त्याच तरतुदी ओरिसातील नद्यांसाठी वापराव्यात असे विचार मांडून त्यावर समितीतील सदस्यांचे मन वळवण्यात त्यांनी यश मिळवले होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रममंत्री असताना,श्रमिकांना खात्रीने रोजगार. यांच्या कार्यक्षमतेत वाढ करणे.त्यांची क्रयशक्ती वाढवणे.श्रमाची उत्पादकता वाढवणे. सोबतच शेती, उद्योग व सेवा क्षेत्राचा विकास आणि पुनर्गठन करणे श्रमिकांना आवश्यक सेवा सुविधा मोफत अथवा अंशदानाच्या स्वरूपात पुरवणे, जसे की वयाच्या १४ वर्षापर्यंत मोफत शिक्षण,वैद्यकीय मदत,पाणीपुरवठा आणि इतर लोकोपयोगी सेवा यामध्ये विद्युत शक्तीचा समावेश होतो.हे सर्व श्रमाच्या कार्यक्षमतेत आणि व्यक्तीच्या आरोग्यात सुधारणा घडवितात.याशिवाय श्रमिकांना वाजवी वेतन हमी,प्रसुती, आजारपणाचे लाभ व सुट्या हे सर्व त्यांना अपेक्षित होते.परंतु यापैकी काहीच गोष्टींची तरतूद करण्यामध्ये त्यांना यश मिळाले होते.

१७ डिसेंबर १९४६ रोजी संविधान सभेमध्ये स्थगन प्रस्तावावर आपले मत व्यक्त करताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की,शेती,उद्योग आणि विमा हे राष्ट्राच्या मालकीचे असले पाहिजे.जेणेकरून सामूहिक शेतीचे तत्त्व रुजवता येईल.उद्योग धंद्यांमध्ये सर्वांना समान संधी मिळेल व विम्याच्या माध्यमातून सर्वांच्या जीवीत्वाची हमी घेता येईल. २५ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेतील आपल्या शेवटच्या भाषणात ते म्हणतात की,आम्ही राजकीय लोकशाहीचा स्वीकार करत आहोत, परंतु लवकरच आम्ही सामाजिक लोकशाही म्हणजे आर्थिक समानता स्वीकारली पाहिजे. त्यासाठी राज्यकर्त्यांनी आपणहून प्रयत्न करावे.

असे सर्वांगाने ओतप्रोत,सर्वगुणसंपन्न,शीलवान,विद्वत्ताप्रचूर,विशाल दूरदृष्टीकोन असणारे,विविध विषयाचे जागतिक स्तरावरील ज्ञानसंपन्न,प्रज्ञावान व्यक्तिमत्व जर देशाचे प्रधानमंत्री झाले असते,तर आज देशाचा इतिहासच नाही तर भूगोलही बदलून गेला असता.शेती,उद्योग,आरोग्य,शिक्षण,सेवा,विकासाची सर्व साधन-संसाधने यामध्ये अमुलाग्र बदल झाला असता.विजेचा तुटवडा,पाण्याची कमतरता,शेतकऱ्यांच्या आत्महत्या,महिलांवरील अत्याचार,बेरोजगारी,नैराश्य,गुन्हेगारी,व्यसनाधीनता इत्यादी समस्या चुटकीसरशी सोडवल्या गेल्या असत्या.सोबतच संविधानाला अपेक्षित महान मानवी मूल्य समता,स्वातंत्र्य,न्याय,बंधुत्व यांचा विकास होऊन,जागतिक स्तरावर देशाची मान उंचावून देश केव्हाच महासत्ता म्हणून नावारूपाला आला असता.....

********

भिमराव परघरमोल - ९६०४०५६१०४,
व्याख्याता तथा अभ्यासक
फुले, शाहू,आंबेडकरी विचारधारा तेल्हारा जिल्हा अकोला

# एक दिवस सलामी, वर्षभर गुलामी

जयंती करणार असाल तर ती एक दिवसाची नसते. जयंती साजरी करणार्याला पुढच्या रोजच्या दिवसाचं व्रत घ्यावं लागतं. ज्या महामानवांची जयंती आपण करतोय त्यांनी ३६५ दिवस आणि २४ * ७ क्षणोक्षणी नव्याने जन्म घेतला. मिनिटामिनिटाला व्यवस्था बदलवण्यासाठी नवीन जन्माला घातले, त्यासाठी स्वत: रोज मरून रोज नवा जन्म घेतला.

बुद्ध म्हणतात मी काल जो होतो, तो आज नाही, मी कालच्या पेक्षा आज वेगळा आहे. काल जो होतो तो इतिहास झाला, मी आज नव्याने जन्म घेतला आहे. कालच्या अनुभवातून मी आज माझ्यात बदल केला आहे. काल मला कोण काय बोललं हे आजच्या मला लागू होत नाही. माझ्या सोबत फक्त ज्ञान येतं. ज्ञान सत्य आहे. सत्य चिरंतन आहे. ज्ञान सत्याच्या कसोटीवर घासून घ्यावं लागतं. जे सत्याच्या कसोटीवर उतरत नाही ते सोडून द्यावं लागतं. अत्त दीप भवं. स्वत:च स्वत:चा प्रकाश व्हा. मी सांगितलं म्हणून विश्वास ठेवू नका. मी सांगितलं ते सत्याच्या कसोटीवर घासून पहा हा दृष्टीकोण आमच्या पर्यंत पोहोचवणारे बाबासाहेब. बाबासाहेबांनी ज्यांना गुरू मानलं ते महात्मा ज्योतिबा फुले. त्यांना साथ देणारी सावित्री माई. बाबासाहेबांच्या कठीण काळात त्यांना आधार देणारी माता रमाई. तुटपुंज्या पैशात महामानवाचं बिर्हाड सांभाळणारी रमाई.

यांची जयंती हे व्रत असतं. हे सेलिब्रेशन नाही. आपल्यात रोज बदल घडवायचं व्रत आहे. खडतर मार्गावर चालण्याची शपथ आहे. या मंडळींचं स्मारक म्हणजे दगडवीटांची इमारत नाही. तर यांचा मार्ग अनुसरणे हे स्मारक आहे. त्यांचा विचार समजून घेऊन तो पुढे नेणे हे स्मारक आहे.

एक दिवस जयंती करून ३६४ दिवस प्रस्थापितांच्या दावणीला चळवळ बांधणारे दलाल हे करू शकत नाहीत, महात्मा फुले यांचं मिशन आपल्याला तोंडपाठ असायला हवं. त्यांच्या पहिल्या शाळेची तारीख आणि त्याचे पुरावे शोधून काढणे, ते प्रकाशित करणे हे त्यांचे स्मारक आहे. बाबासाहेबांच्या बाबतीतले त्यांचे पहिल्या गोलमेज परीषदेपासूनचे ते अखेरच्या दिवसापर्यंतचे त्यांचे आरक्षण, सेपरेट सेटलमेंट, क्रांती-प्रतिक्रांती आणि विठ्ठल हाच बुद्ध असे प्रकाशित अप्रकाशित लिखाण शोधून पुराव्यांसहीत प्रसिद्ध करणे हे त्यांचे स्मारक आहे.

ही स्मारके घरोघरी पोहोचवणे, त्यासाठी स्वत:ला झोकून देणे ही त्यांची जयंती आहे. कारण हे तर रोज जन्मले आहेत. रोजच्या खस्ता खाऊन त्यातून रोज त्यांनी फिनिक्स पक्षाप्रमाणे नवा जन्म घेतला आहे. अडचणींवर मात करून नवा मार्ग शोधला. म्हणून आपण आहोत.

एक दिवस जयंती करून ऋणातून मुक्त होता येत नाही. हा शॉर्टकट मारता येत नाही. तुम्ही एक दिवसाची जयंती करा किंवा न करा, तुम्हाला महामानवांच्या ऋणातून मुक्त होता येत नाही. ते बोलून दाखवून मुक्त होता येत नाही. तुमच्या जगण्याला ज्यांनी अर्थ दिला, त्यांचे काम पूर्ण करण्यासाठी खारीचा का होईना वाटा उचलणे, त्यासाठी रोजच्या रोज मरण्याची तयारी ठेवणे ही जयंती आहे.

११ एप्रिल असेल किंवा १४ एप्रिल ही त्यांनी भौतिकदृष्ट्या जगात प्रवेश करण्याची तारीख आहे, म्हणून या दिवशी तुम्ही झोकून देण्याचा संकल्प करण्यासाठी जयंती साजरी करणार असाल तर तुमचे स्वागत आहे. तरच जयंती साजरी करण्याला अर्थ आहे.

एक दिवस सलामी आणि इतर दिवशी गुलामी यासाठी जयंती करणार असाल तर तुम्ही स्वत:ला फसवू शकणार नाही. तुम्ही महामानवांना फसवू शकत नाही. ज्या वेळी पुतळ्याला हार घालायला जाल त्या वेळी त्यांच्या डोळ्यात डोळे घालून बघा, एक दिवसाची जयंती करायला तुमचं लेकरू आलंय बाबा, असं सांगून बघा.

हे तुम्ही सांगू शकता ? एक दिवसाची जयंती आणि इतर दिवशी विश्रांती , ते बाबांचं लेकरू असू शकत नाही. ते आईबापाला धोका देणारं लेकरू होय. आईबाप अशा लेकराला माफ करू शकत नाहीत.

आजवर आपण जयंतीच साजरी केली. बाबांनी जे आपल्याला दिलं ते आपण राखू शकलो नाही. नेत्यांना दोष देऊन मोकळं होणं हे आपलं निर्ढावलेपण आहे. आपण बाबांची पुस्तकं वाचली नाहीत तर आपण इतरांना काय सांगणार ? त्यांनी दिवसाची रात्र करून ही ग्रंथसंपदा निर्माण केली.

स्वत:चं स्मारक निर्माण केलं. आपल्यासाठी लढा देत असताना झोपेचा त्याग करून लिखाण केलं. त्यामुळे दुर्धर आजार ओढवून घेतले. मधुमेह जडला. तो बळावला.

आणि आपण ही ग्रंथसंपदा वाचत नाही. कुणी वाचायला सांगितलं तर आम्हाला समजत असतं तर असा पवित्रा घेतो. पोरं जन्माला कशी घालायची हे कुणी शिकवावं लागत नाही . जगात आल्यावर सगळं समजतं, शिकता येतं.

चळवळीतले कुणीच आभाळातून पडलेले नाहीत. ज्यांनी वाचलं ते तुमच्या प्रमाणेच होते. त्यांना बाबासाहेब नीट समजले .

बाबांची पुस्तकं वाचली तर त्यांनी आपल्याला जे दिलं ते कसं दिलं हे समजेल. ते राखायचं कसं याची समज येईल. आपण ते केलं नाही. आपण आपल्याला बाबासाहेब सांगणार्या उच्चवर्णियांवर बाबासाहेब सोडून दिले. आपण जयंतीला त्यांना पैसे देऊन बोलावले. त्यांना आपले राजे बनवले आणि त्यांना मतं देऊन त्यांची गुलामी केली.

आपण स्टेज सजवलं, वर्गणी काढली आणि तिथे तोंडदेखले बाबासाहेब सांगणार्यांना बोलावून त्यांना आपल्यावर लादून घेतलं. त्यांनी बाबासाहेब वाचले आणि आपल्याला त्यांच्या सोयीने सांगितले आपण ते स्विकारले. कारण आपण वाचले नाहीत. आपला पैसा.आपलं स्टेज, आपले मतदार आपण त्यांना फुकटात दिले, वरून बिदागी दिली.

आणि आता तर त्यांना एव्हढं गब्बर बनवलं कि आता त्यांच्या पैशांनी जयंती चालते. उपकृत व्हायची स्पर्धा भरलीय. उपकृत झाल्यावर त्याची परतफेड म्हणून निवडणुकीत मतांची बेगमी करायची स्पर्धा भरलीय. ही मतांची झोळी भरून देण्यासाठी स्पॉन्सर्ड जयंतीचे दलाल निर्माण झाले आहेत. त्यांचे फोटो झळकत आहेत.

आमचे आरक्षण संपले. शिक्षण महागले. आरोग्य सेवा महागल्या. कामाचे तास वाढले. पगार कमी झाले. बेरोजगारी वाढली. आम्ही परावलंबी झालो. ही गुलामी आली. पण आमच्या जयंतीला आम्ही यावर बोलायला तयार नाही.

मग आम्ही बाबांच्या डोळ्यात डोळे घालून काय सांगणार ?

मंदार माने

# आणखी एक बोजा

इंधनाच्या दरात करण्यात आलेली उत्पादन शुल्काची वाढ, गॅस सिलिंडरच्या दरात झालेली वाढ, पाइप गॅसच्या दरात झालेली वाढ, या सगळ्या दरवाढीच्या बातम्या एकापाठोपाठ एक आल्यानंतर लोकांवर आणखी एक बोजा सरकारने टाकला आहे. हा बोजा म्हणजे सहकारी सोसायटीमध्ये राहणार्या सभासदांच्या मेंटेनन्सवर नव्याने आकारल्या जाणार्या जीएसटीचा आहे. शहरी मध्यमवर्गीयांसाठी हा दणका मोठा आहे. शहरी मध्यमवर्गीय ज्या सोसायट्यांमध्ये राहतात त्या सोसायटीतील देखभाल खर्चासाठी ते दरमहा काही पैसे मेंटेनन्स म्हणून भरतात. या मेंटेनन्सवर आता तब्बल १८ टक्के जीएसटी लागू केला जाणार आहे. आता खरं म्हणजे ही लोकांनी कपाळावर हात मारून घ्यावी अशी बाब आहे. या आधीच देशातील सर्व नागरिक ब्रँडेड आटा, पनीर, दही अशा वस्तूंपासून जवळपास सगळ्याच वस्तूंवर वेगवेगळ्या टप्प्यातील जीएसटी भरत असतो. वह्या, पेन्सिल, दप्तरे अशा शालेय शैक्षणिक साहित्यावर पण जीएसटी लागूच आहे. सर्वच प्रकारच्या सेवांवरसुद्धा जीएसटी लागू आहे, फक्त सोसायट्यांचा मेंटेनन्स हा एकच विषय राहिला होता, सरकारची नजर आता त्याच्यावरही पडली आहे. हे सरकार देशातील जनतेला सळो की पळो करून सोडत आहे असेच चित्र दुर्दैवाने दिसते आहे. जनतेला दिलासा देणारी कोणतीही बाब किंवा निर्णय सरकारकडून घेतला जात नाही, किंबहुना जनतेला आता सरकारकडून कोणतीच आशा उरलेली नाही. देशाच्या भीषण आर्थिक व्यवस्थेचा फटका या आधीच जनसामान्यांना बसलेला आहे. बेरोजगारीचा दर गेल्या पन्नास वर्षातील उच्च अंकी पातळीवर आहे, नागरिकांचे उत्पन्न घटते आहे, कुठल्याच क्षेत्रात अपेक्षित पगारवाढ होताना दिसत नाही. यामुळे अत्यंत घायकुतीला आलेला गरीब आणि मध्यमवर्ग आपले दैनंदिन जीवन कसेबसे रेटत असताना केंद्र सरकारने अलीकडे हे धक्क्यामागून धक्के दिले आहेत. सरकार जनसामान्यांचा कुठल्याच दृष्टीने का विचार करत नसावे हे कोडे अजिबात उलगडत नाही. प्रसारमाध्यमांवर याची जरासुद्धा चर्चा होताना दिसत नाही. वास्तविक सरकारने स्वतःचे नुकसान करून न घेता आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे जे दर घसरले आहेत त्याचा लाभ जनतेला करून देणे सहज शक्य असताना सरकारने मात्र इंधनावरील उत्पादन शुल्कात वाढ करून जो लाभ नागरिकांना मिळणे अपेक्षित होता त्यात सरकारने स्वतःच हात धुऊन घेतल्याचे पाहायला मिळाले आहे. हे कथानक आजवर आपण इतक्या वेळा ऐकले आहे की देशातील इंधनाचे भाव कच्च्या तेलाच्या आंतरराष्ट्रीय दरावर ठरतात, मग हे जर असे असेल तर कच्च्या तेलाचे भाव उतरल्यानंतर त्याचा जनतेला लाभ का होत नाही, इंधनावर उत्पादन शुल्क लावून जनतेला होणारा हा लाभ सरकार परस्पर का काढून घेते, हा प्रश्न मोदी सरकारच्या काळात वारंवार पडतो आहे. इंधनावरील उत्पादन शुल्कात करण्यात आलेल्या वाढीतून केंद्र सरकारने गेल्या काही वर्षांत ३५ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिकची रक्कम वसूल केली आहे. म्हणजे याचाच अर्थ कच्च्या तेलाच्या किमती घसरल्याने जनतेच्या खिशात जे ३५ लाख कोटी रुपये जाणार होते ते सरकारने परस्पर काढून घेतले आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाचे भाव आणि देशातील पेट्रोल, डीझेलचे दर यावर आता कोणीच चर्चा करताना दिसत नाही किंबहुना ती चर्चाच होऊ दिली जात नाही. जनतेला अंधारात ठेवून मुस्कटदाबी करण्याचे हे अजब तंत्र सरकारने अवलंबले असले, तरी माहिती तंत्रज्ञानाच्या या युगात कोणत्या ना कोणत्या मार्गाने जनतेपर्यंत ही माहिती पोहोचतच असते. त्यामुळे जनता अजूनही शांत दिसत असली तरी तिच्या मनात या सगळ्या भीषण आर्थिक संकटाविषयी संतापाची भावना आहे. त्या भावनेचा उद्रेक होण्याची वाट सरकार पाहात आहे का, असा प्रश्न या निमित्ताने विचारावा लागेल. मध्यंतरी राघव चड्ढा यांनी संसदेत भाषण करताना मानवी जीवनाच्या जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या ज्या सहा प्रमुख अवस्था आहेत, त्या प्रत्येक टप्प्यावर जनतेला कसा कर भरावा लागतो याचे तपशीलवार विवेचन केले होते. इतकी सगळी करवसुली करूनही सरकारने नागरिकांना एक तरी उत्तम दर्जाची सुविधा पुरवली आहे का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला होता आणि तो अत्यंत रास्त आहे. जर जनतेला जागतिक दर्जाची आरोग्य सुविधा, शिक्षण सुविधा किंवा अन्य सार्वजनिक सुविधा यापैकी एकही सुविधा मिळत नसेल आणि तरीही सरकार फक्त विविध मार्गाने भरमसाठ वसुलीचाच मार्ग अवलंबत असेल तर मग सरकारकडे जमा होणारा इतका महाप्रचंड कर महसूल नेमका जातो तरी कुणाकडे हा प्रश्न वारंवार निर्माण होतो. काही ठराविक उद्योगपतींना सवलतीची खैरात होते, त्यांचे लाखो कोटी रुपयांचे कर्ज माफ होते यावर रोजच आक्षेप नोंदवले जात आहेत. मग जनतेला अशाच सवलती का मिळत नाहीत. जनतेने फक्त कर भरायचा आणि सरकारशी संबंधित असलेल्या ठराविक उद्योगपतीने मजा मारायची हे असे किती दिवस चालणार, याचा आता सोक्षमोक्ष लावण्याची वेळ आली आहे. सहकारी सोसायट्यांच्या मेंटेनन्सवर १८ टक्के जीएसटी हा अतिरेकीपणाचा कळस आहे.

# विलास सहकारी साखर कारखाना चेअरमनपदी वैशालीताई देशमुख यांची तर व्हा. चेअरमनपदी वैजनाथराव शिंदे यांची बिनविरोध निवड







लातूर / प्रतिनिधी :- सहकार आणि साखर उदयोगाच्या यशस्वी वाटचालीसाठी पथदर्शी ठरलेल्या विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमनपदी वैशालीताई विलासराव देशमुख यांची तर व्हा. चेअरमनपदी वैजनाथराव शिंदे यांची बिनविरोध निवड झाली. विलास सहकारी साखर कारखान्याची २१ जागेसाठी सन २०२५ ते ३० साठी पंचवार्षीक निवडणुक झाली. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री आणि लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, मुख्य प्रतोद विधीमंडळ काँग्रेस, महाराष्ट्र विधानसभा, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली विलासराव देशमुख सहकार पॅनलच्या माध्यमातून निवडणुक लढवली. विलास सहकारी साखर कारखान्याची उभारणीपासूनची वाटचाल पाहता सर्व सभासदांनी ही निवडणुक बिनविरोध निवडूण दिली आहे. विलास कारखान्याच्या संचालक मंडळाची निवडणूक नुकतीच पार पडली. त्यानंतर चेअरमन आणि व्हा.चेअरमन पदाची निवड प्रक्रिया मंगळवार दि. १५ एप्रिल रोजी उपविभागीय अधिकारी तथा अध्याशी अधिकारी रोहिणी नऱ्हे - विरोळे यांच्या अध्यक्षमेखाली निवड प्रक्रीया पार पडली. चेअरमन आणि व्हा. चेअरमन पदाच्या निवडीसाठी झालेल्या बैठकीस माजी आमदार वैजनाथराव शिंदे, रविंद्र काळे, रणजित राजेसाहेब पाटील, अनंत व्यंकटराव बारबोले, रसूल दिलदार पटेल, तात्यासाहेब छत्तू पालकर, गोवर्धन मोहनराव मोरे, हणमंत नागनाथराव पवार, नरसिंग दगडू बुलबुले, नेताजी शिवाजीराव साळुंके (देशमुख), नितीन भाऊसाहेब पाटील, रामराव विश्वनाथ साळुंके, अमृत हरिश्चंद्र जाधव, सतीश विठ्ठलराव शिंदे (पाटील), दीपक अर्जुन बनसोडे, लताबाई रमेश देशमुख, शाम भारत बरुरे, सुभाष खंडेराव माने संचालक यांच्यासह सहायक निबंधक रेणापूर आर. एल. गडेकर, नायब तहसीलदार श्रीमती अर्चना मैंदर्गी, नायब तहसीलदार सुधीर देशमुख, महसुल सहायक ओमप्रकाश मेहकर यांची उपस्थिती होती. सर्व संचालक मंडळाची बैठक होऊन बिनवीरोध निवड प्रक्रीया पार पडली. विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमनपदी वैशालीताई विलासराव देशमुख यांची तर व्हा. चेअरमनपदी वैजनाथराव शिंदे यांची बिनविरोध निवड यावेळी झाली. विलास कारखान्याचे लोकनेते विलासरावांच्या नावाला साजेसे कार्य; अमित देशमुखांनी व्यक्त केला विश्वास विलास सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाच्या सत्कार समारंभात बोलताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी कारखान्याच्या वाटचालीवर समाधान व्यक्त केले. लोकनेते विलासराव देशमुख यांच्या नावाने कार्यरत असलेला हा कारखाना त्यांच्या नावाला साजेसे कार्य करत असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यानंतर पुढे बोलतांना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले, मांजरा परिवारातील सर्व साखर कारखान्यांच्या निवडणुका सभासदांनी बिनविरोध पार पाडल्या आहेत. आपणही आपल्या प्रथेप्रमाणे चेअरमन, व्हा. चेअरमनची निवडणूक प्रक्रिया ही बिनविरोध पार पाडली आहे. लोकनेते विलासराव देशमुख यांच्या नावाने हा विलास सहकारी साखर कारखाना कार्यरत आहे, त्यांच्या नावाला साजेसे कार्य आपण करत आहोत. या संस्थेला २५-३० वर्षे आता पूर्ण होत आहेत. या ठिकाणी उपस्थित्यांपैकी अनेक जण या कारखान्याचे संस्थापक संचालक आहेत, संस्थेच्या जडणघडणीत प्रत्येकाचा मोलाचा वाटा आहे. संस्थेच्या प्रवासात आपण सर्वांना सामावून घेण्याचे काम केले आहे. संस्था टिकली पाहिजे, संस्थेचे चांगले काम झाले पाहिजे, यासाठी आपण काम करत राहतो. आज पुढील पंचवार्षिक कारखान्याच्या कार्यक्रमाची सुरुवात होत आहे. सध्याच्या संचालक मंडळात काही नवीन संचालक आहेत, तर काही जुने संचालक यांना पुन्हा संचालक म्हणून काम करण्याची संधी मिळालेली आहे. पुढे बोलताना ते म्हणाले, लोकनेते विलासराव देशमुख यांनी मांजरा पट्ट्यात या निवळीच्या माळरानावर हे शेतकऱ्यांचे मंदिर उभारले. या माळरानाचे नंदनवन आता झाले आहे. या कारखान्याचे भविष्यात युनिट एक, दोन, तीन, चार होतील. येणारा हंगाम मोठा आहे. मांजरा, विलास, रेणा सहकारी साखर कारखाने आदरणीय विलासराव देशमुख यांची प्रेरणा, माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांचे मार्गदर्शनाने चांगले चालत आहेत. येथे सभादाच्या हिताचा कारभार असल्याने निवडणुका बिनविरोध होतात याचे सर्व श्रेय सभासदांचे आहे. या संस्था अधिक सक्षम होऊन शेतकऱ्यांना न्याय कसा देता येईल यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. सध्याचा काळ आर्टिफिशियल इंटेलिजन्स एआयचा आहे, त्याचा वापर शेतकऱ्यांनी ऊस शेतीमध्ये करावा. शेवटी त्यांनी विलास सहकारी साखर कारखान्याच्या नूतन चेअरमनपदी वैशालीताई विलासराव देशमुख आणि व्हा. चेअरमनपदी माजी आमदार वैजनाथदादा शिंदे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलतांना नूतन चेअरमन वैशालीताई विलासराव देशमुख यांनी मनोगत व्यक्त करून विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन पदी सर्वांनी काम करण्याची संधी दिल्याबद्दल त्यांनी आभार मानले. यावेळी बोलतांना नूतन व्हा. चेअरमन वैजनाथदादा शिंदे म्हणाले की, या विलास कारखान्याला जमीन खरेदी करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले. देशात राज्यात एक नंबरचा हा कारखाना नावाजलेला आहे, लोकनेते विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली हा कारखाना उभा राहिला आहे. लोकनेते विलासराव देशमुख नेहमी म्हणायचे, आपण कारखान्याचे मालक नाही आहोत आपण फक्त विश्वस्त आहोत. विलास सहकारी साखर कारखान्याच्या व्हाईस चेअरमनपदी सर्व नेत्यांनी मला काम करण्याची संधी दिल्याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी व्हा. चेअरमन रवींद्र काळे यांनी करून नूतन चेअरमन वैशालीताई विलासराव देशमुख व व्हा. चेअरमन माजी आमदार वैजनाथराव शिंदे यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या तसेच व्हा. चेअरमनपदी पाच वर्षे काम करण्याची संधी दिल्याबद्दल मान्यवरांचे त्यांनी आभार मानले. प्रारंभी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, चेअरमन वैशालीताई विलासराव देशमुख व मान्यवरांनी विलास सहकारी साखर कारखाना परिसरातील लोकनेते विलासराव देशमुख यांच्या पुतळ्यास पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी झालेल्या कार्यक्रमास बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, टवेन्टिवनचे व्हा. चेअरमन विजय देशमुख, पी.के.पाटील, राजेंद्र मस्के, भैरवनाथ सुर्यवंशी, बळवंत काळे, राजाभाऊ जाधव, चंद्रशेखर दंडीमे, रामचंद्र सुडे, उमेश बेद्रे, चंद्रकांत टेकाळे, जयचंद भिसे, रमेश थोरमोटे पाटील, जगदीश चोरमले, प्रभावती माळी, सुभाष जाधव, अनिल पाटील, गोविंद बोराडे, भैरवनाथ सवासे, गुरुनाथ गवळी, बाळासाहेब बिडवे, नारायण पाटील, सुर्यकांत सुडे, भारत आदमाने, संजय पाटील खंडापूरकर, ज्ञानोबा पडीले, रमेश देशमुख आदी उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल इंगळे पाटील यांनी केले तर शेवटी आभार माजी व्हाईस चेअरमन गोविंद बोराडे यांनी मानले.

# संपूर्ण आयुष्य खर्ची घातले तरी मतदारांच्या ऋणातून कधीच उतराई होऊ शकणार नाही - आ. रमेशआप्पा कराड यांचे प्रतिपादन



लातूर :- विधानसभेची निवडणूक रमेश कराड यांनी लढवली नाही तर गोरगरीब, सर्वसामान्य कार्यकर्त्यांनी हातात घेऊन लढवली, मतदारांनी प्रचंड आशीर्वाद दिले, नवा इतिहास घडवला. हे कदापी विसरू शकत नाही, मी माझे संपूर्ण आयुष्य खर्ची घातले तरी मतदारांच्या या ऋणातून, उपकारातून कधीच उतराई होऊ शकत नाही असे प्रतिपादन लातूर ग्रामीण मतदार संघातील नवनिर्वाचित आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी केले.

लातूर ग्रामीण विधानसभा निवडणुकीत मतदारानी एकाधिकारशाही, हुकूमशाही आणि धनशक्ती विरुद्ध आवाज उठून भाजपा महायुतीचा ऐतिहासिक विजय केल्याच्या निमित्ताने मतदारांशी संवाद साधून जाहीर आभार व्यक्त करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या सभेत आ. रमेशआप्पा कराड बोलत होते याप्रसंगी शिवसेना (शिंदे गट) जिल्हा संपर्कप्रमुख ॲड. बळवंतराव जाधव, युवा नेते ऋषिकेशदादा कराड, भाजपा किसान मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, ओबीसी मोर्चाचे भागवत सोट, पंचायत राज सेल जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, हनुमंतबापू नागटिळक, बन्सी भिसे, वैभव सापसोड, सुरज शिंदे, साहेबराव मुळे, विजय काळे, प्रताप पाटील, सतीश आंबेकर, वसंत करमूडे, भैरवनाथ पिसाळ, शामसुंदर वाघमारे, विश्वास कावळे, काशिनाथ ढगे, राजकुमार सुरवसे, बालाजी दुटाळ यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. या सभेस चिंचोली आणि परिसरातील गावागावातून मोठ्या उत्साहाने कार्यकर्त्यांसह मतदार बंधू भगिनी उपस्थित होते.

चिंचोली गावात निवडणूक काळात येऊ शकलो नाही तरीही आकराशेहून अधिक मताधिक्य मिळाले हा माझा विश्वास होता. असे सांगून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, मतदार संघातील गावागावात वाडी - वस्तीत कार्यकर्त्यांनी जिवाचे रान करून, मेहनतीने, जिद्दीने निवडणूक जिंकली. निवडणुकीत पैशाचा पाऊस पडला, मतदारांचे इमान विकत घेण्याचा प्रयत्न झाला. माझे कार्यकर्ते गोरगरीब, अल्पभूधारक असून कसल्याही आमिषाला बळी पडले नाहीत उलट त्यांनाच त्यांची जागा दाखवून जमिनीवर आणले हा माझा अभिमान आहे.

विधान परिषदेच्या आमदारकीचा उपयोग ग्रामीण भागातील गावा गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि गोरगरीब सर्वसामान्य माणसाच्या डोळ्यातील अश्रू पुसण्यासाठी केला. तीन - साडेतीन वर्षात मतदारसंघात तब्बल तेराशे कोटी रुपयांची कामे मंजूर केली. लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या विकासाचा नवीन पॅटर्न निर्माण करण्याचे पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी सर्वांनी साथ द्यावी असे आव्हान करून सर्वच विकास कामे एका दिवसात होणार नाहीत. निश्चितपणे प्रत्येक गावच्या सर्वांगीण विकास कामांना टप्प्याटप्प्याने निधी दिल्याशिवाय राहणार नाही असे आ. कराड यांनी बोलून दाखविले.

तांत्रिक अडचणीमुळे मांजरा, रेणा, विकास साखर कारखान्याच्या निवडणुका आपण सक्षमपणे लढू शकत नव्हतो यामुळे माघार घेतली असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, सहकारी साखर कारखाने हे देशमुख यांच्या नव्हे तर शेतकऱ्यांच्या मालकीचे आहेत जोपर्यंत या कारखान्याचे शेतकरी मालक होणार नाहीत तोपर्यंत मी स्वस्थ बसणार नाही. या पुढील काळात शेतकऱ्यांची आडवणूक आणि पिळवणूक करण्याचा प्रयत्न झाला तर त्यांना त्यांची जागा दाखवून दिल्याशिवाय राहणार नाही रस्त्याने फिरू देणार नाही असा इशारा आ कराड यांनी यावेळी बोलताना दिला. लोकसभा निवडणुकीत एका डोळ्याची शस्त्रक्रिया झाली होती मात्र आठव्या दिवशी घराबाहेर पडल्याने विधानसभा निवडणुकी नंतर परत डोळ्याचा त्रास झाल्याने पुन्हा शस्त्रक्रिया करावी लागली काँग्रेसवाल्यांनी अनेक उलट सुलट चर्चा केली, अफवा सोडल्या कदाचित ते शुभचिंतक असतील असे सांगून त्याकडे दुर्लक्ष करा, कामावर निष्ठा ठेवा, जनता जनार्धन हेच परमेश्वर आहे जोपर्यंत गोरगरीब जनतेचा आशीर्वाद माझ्या पाठीशी आहे तोपर्यंत काहीही होणार नाही असेही त्यांनी बोलून दाखविले.

लातूरची जनता क्रांतिकारी आहे रमेशआप्पा निवडून आले आणि देशमुखचे पाय जमिनीला लागले. मतदार बंधू भगिनींनी आपल्यावर विश्वास टाकला त्या विश्वासाला पात्र राहून काम करण्याची जबाबदारी आता कार्यकर्त्याची असल्याचे सांगून यावेळी बोलताना ॲड. बळवंतराव जाधव म्हणाले की, येणाऱ्या काळात होणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीत आपले कार्यकर्ते सत्तेत सहभागी झाले पाहिजेत यासाठी सर्वांनी मेहनत करण्याची गरज आहे. शेतकऱ्याचा सन्मान वाढविण्यासाठी यापुढील काळात काम करण्याची आवश्यकता त्यांनी बोलून दाखविली. युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांनी लातूर ग्रामीण मतदारसंघातील नवा इतिहास घडला माझ्या कातडीची जोडे करून मतदारांच्या पायात घातले तरी त्यांनी कराड परिवारावर दाखवलेल्या विश्वासाचा उपकार फिटणार नाहीत. यापुढील काळात सर्वांना सोबत घेऊन सर्वांच्या मनातील विकासाच्या संकल्पना पूर्ण करण्यासाठी काम करूया असे बोलून दाखवले.

या सभेत विक्रमकाका शिंदे, भागवत सोट, हनुमंतबापू नागटिळक, साहेबराव मुळे, सुरज शिंदे, राजकुमार सुरवसे, योगीराज साखरे, राम गोरे यांच्यासह अनेकांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रारंभी बप्पासाहेब कावळे यांनी सभेचे प्रास्ताविक केले तर शेवटी ईश्वर बुलबुले यांनी उपस्थित आमचे आभार मानले. सभेचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले.

यावेळी भाजपा व मित्र पक्षाचे गोविंद नरहरे, शरद दरेकर, बाबा भिसे, विनायक मगर, गोपाळ पाटील, विजयकुमार मलवाडे, पांडुरंग बालवाड, रशीद पठाण, आदिनाथ मुळे, धनराज शिंदे, बालासाहेब कदम, चंद्रकांत वांगस्कर, ज्ञानेश्वर जुगल, पांडुरंग गडदे, सदाशिव गव्हाणे, सुधाकर काळे, विश्वनाथ शिंदे, सचिन देशमुख, दत्ता सप्ताळ, मारुती शिंदे, पद्माकर होळकर, नानासाहेब भिसे, रमेश सुरवसे, अशोक गंणगे, धनंजय जाधव, रमेश लहाडे, सचिन लटपटे, रुपेश काळे, सचिन सवई, बालाजी नाईकवाडे, प्रशांत शिंदे, वैजनाथ लवटे, बालाजी कावळे, अण्णा भडंगे, श्रीकांत देशमाने, रंगनाथ नवले, किशोर कुलकर्णी, गोविंद नांदे, सुनील कावळे यांच्यासह चिंचोली आणि परिसरातील विविध गावचे भाजपा व मित्र पक्षाचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी कार्यकर्ते मतदार बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गर्भवती महिलांनी 'हा' ज्यूस प्यावा का? तज्ज्ञ सांगतात, अल्ट्रासाऊंड करण्यापूर्वी


विशेषतः गर्भधारणेच्या सुरुवातीच्या महिन्यांत गर्भवती महिलांना अनेक वेळा अल्ट्रासाउंड तपासणीपूर्वी पाणी पिण्यास सांगितले जाते; जेणेकरून बाळाची हालचाल होण्यास मदत होईल. पण काही लोक म्हणतात की, अल्ट्रासाउंडपूर्वी संत्र्याचा रस प्यायल्याने अधिक फायदा होतो? तुम्हालाही जर हाच प्रश्न पडला असेल, तर याबद्दल अधिक जाणून घेऊ. सोशल मीडियावर एक पोस्ट व्हायरल झाली आहे, ज्यात सांगितले आहे की, गर्भवती महिलांनी अल्ट्रासाउंडच्या ३० मिनिटे आधी थोडासा संत्र्याचा रस प्यावा. थोडासा संत्र्याचा रस बाळाला जागं करतो, ज्यामुळे ते जास्त हालचाल करतं आणि अल्ट्रासाउंड चाचणीत ते स्पष्ट दिसतं, अशी माहिती ींिशसपरपलूर्सीळवश.ले या पेजवर दिली आहे. अल्ट्रासाऊंड करण्यापूर्वी संत्र्याचा रस प्यावा का? पाणी प्यायल्यानं गर्भवती महिलांचं मूत्राशय भरतं आणि त्यामुळे गर्भाशय वर सरकते आणि अल्ट्रासाउंडमध्ये बाळाचा फोटो स्पष्टपणे दिसतो, असं डॉक्टर मानसी शर्मा (स्त्रीरोगतज्ज्ञ, मदरहूड हॉस्पिटल, खराडी) यांनी सांगितलं. गर्भधारणेत अल्ट्रासाउंडपूर्वी संत्र्याचा रस प्यायचा की नाही हे स्कॅनच्या टप्प्यावर आणि कारणावर अवलंबून असतं. पहिल्या त्रैमासिकात (१२-१४ आठवड्यांपर्यंत) याची गरज नसते; पण दुसऱ्या किंवा तिसऱ्या त्रैमासिकात बाळ जास्त हालचाल करीत नसेल, तर थोडासा संत्र्याचा रस उपयोगी ठरतो. त्यातली साखर बाळाला थोडी ऊर्जा देते आणि त्याच्या हालचाली सुरू होतात. जेव्हा बाळ शांत असतं किंवा नीट दिसत नाही तेव्हा हे पेय अल्ट्रासाउंडदरम्यान उपयोगी पडतं, असं डॉक्टर तृप्ती रहेजा (मुख्य सल्लागार व स्त्रीरोगतज्ज्ञ, सी. के. बिर्ला हॉस्पिटलएँ, दिल्ली) यांनी सांगितलं. संत्र्याचा रस सामान्यतः हानिकारक नसतो; पण अल्ट्रासाउंडपूर्वी तो पिणं नेहमीच योग्य ठरेल असं नाही, असं डॉक्टर शर्मा म्हणाल्या. तो आम्लयुक्त (ॲसिडिक) असतो. त्यामुळे कधी कधी त्रास होऊ शकतो; विशेषतः जर ॲसिडिटी किंवा जळजळ होत असेल तर, असंही त्यांनी सांगितलं. संत्र्याच्या रसात, विशेषतः दुकानातून आणलेल्या रसात जास्त साखर असते. त्यामुळे अल्ट्रासाउंडदरम्यान बाळ अचानक हालचाल करू शकतं. कधी कधी यामुळे स्पष्ट फोटो मिळणं कठीण होऊ शकतं. त्यामुळे गर्भवती महिलांनी संत्र्याच्या रसाऐवजी पाणी पिणं जास्त योग्य ठरतं. स्कॅनपूर्वी पुरेसं पाणी प्यायल्यानं पोटावर ताण येत नाही आणि तंत्रज्ञांना बाळ नीट पाहता येतं, असं डॉक्टर शर्मा म्हणाल्या. अल्ट्रासाऊंड करण्यापूर्वी काय प्यावे? तथापि, संत्र्याचा रस हा एकमेव पर्याय नाही - ग्लुकोजचं पाणी किंवा चॉकलेटच्या तुकड्यासारखा कोणताही गोड पदार्थ किंवा पेय समान परिणाम देऊ शकतो, असं डॉक्टर रहेजा यांनी सांगितलं. सामान्यतः या तपासणीसाठी संत्र्याचा रस जास्तकरून वापरला जातो. कारण- तो पचायला सोपा असतो आणि सहज मिळतो. पण, तो आवश्यक नाही आणि त्याचा जास्त प्रमाणात वापर करणं टाळावं; विशेषतः ज्यांना गर्भावस्थेत मधुमेह किंवा साखरेची संवेदनशीलता असेल त्यांनी, असं डॉक्टर रहेजा यांनी सांगितलं.

# फिजिओथेरेपिस्ट यांच्या मते वाढत्या वयासह आरोग्य उत्तम राखण्यासाठी या तीन गोष्टी करायला हव्या

हळूहळू वय वाढत जाते तसतशी जास्तीत जास्त आरोग्याची काळजी घ्यायला हवी. एकेकाळी सहज वाटणाऱ्या गोष्टीही आव्हानात्मक वाटू लागतात, परंतु याचा अर्थ असा नाही की तुम्ही शरीराला संथ ठेवले पाहिजे. उलट योग्य सवयींसह सक्रिय राहिल्याने तुम्ही तुमचे वृद्धस्त आणखी चांगल्याप्रकारे घालवू शकता.

दिल्लीतील सीके बिर्ला हॉस्पिटलमधील फिजिओथेरपी विभागाचे प्रमुख डॉ. सुरेंद्र पाल सिंग यांनी सांगितले की, वयानुसार प्रत्येकाने तीन आवश्यक पद्धतींचा अवलंब केला पाहिजे. या धोरणांमध्ये संतुलन आणि समन्वय यांचा समावेश आहे - सक्रिय आणि परिपूर्ण जीवनासाठी हे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. वृद्धत्वाला चैतन्य देऊन स्वीकारण्यासाठी तुम्ही त्यांना तुमच्या दैनंदिन दिनचर्येत कसे समाविष्ट करू शकता ते जाणून घ्या. गतिशीलतेला आधार देण्यासाठी व्यायाम वयानुसार, स्नायूंचा टोन आणि सांध्यांची स्थिरता नैसर्गिकरित्या कमी होते, ज्यामुळे गतिशीलता कमी होते आणि दुखापतींचा धोका वाढतो. या बदलांना तोंड देण्यासाठी व्यायाम अत्यंत महत्त्वाचे आहेत, असे डॉ. सिंग म्हणाले.

हे का महत्त्वाचे आहे डॉ. सिंग यावर भर देतात की, स्नायूंची ताकद वाढवणे आणि सांध्यांची स्थिरता सुधारणे, ज्यामुळे पायऱ्या चढणे किंवा किराणा सामान वाहून नेणे यांसारखी दैनंदिन कामे खूप सोपी होतात. स्क्वॅट्स, लंग्ज आणि रेझिस्टन्स बँड वर्कआउट्ससारखे व्यायाम प्रमुख स्नायू गटांना लक्ष्य करतात आणि एकूण गतिशीलता वाढवतात.



सुरुवात कशी करावी आठवड्यातून २-३ वेळा तुमच्या दिनचर्येत साधे व्यायाम समाविष्ट करा. नवीन शिकणाऱ्यांसाठी, वॉल पुश-अप्स किंवा चेअर स्क्वॅट्ससारखे बॉडीवेट व्यायाम हे उत्कृष्ट सुरुवातीचे मुद्दे आहेत. बॅलेन्स आणि समन्वय वयानुसार तोल जाणे हा सर्वात सामान्य धोका आहे, परंतु संतुलन आणि समन्वयावर लक्ष केंद्रित करणारे व्यायाम शिकल्यास हा धोका लक्षणीयरीत्या कमी होऊ शकतो, असे डॉ. सिंग म्हणाले. हे का महत्त्वाचे आहे चांगले संतुलन आणि समन्वय राखल्याने पडणे टाळण्यास मदत होते आणि हालचालींमध्ये आत्मविश्वास वाढतो. डॉ. सिंग योग आणि ताईचीसारख्या क्रियाकलापांची शिफारस करतात, जे शरीराची जाणीव आणि नियंत्रण वाढवण्यासाठी ओळखले जातात.

सुरुवात कशी करावी एका पायावर १०-१५ सेकंद उभे राहणे किंवा टाचेपासून पायापर्यंत सरळ रेषेत चालणे, यासारख्या साध्या संतुलन व्यायामांनी सुरुवात करा. ताकद आणि स्थिरता निर्माण करण्यासाठी हळूहळू योगासनांचा समावेश करा. हे का महत्त्वाचे आहे? डॉ. सिंग सांगतात की, जेव्हा वाकणे, वस्तू उचलणे किंवा पोहणे यांसारख्या -उद्धकठीण होतात, तेव्हा लक्ष्यित व्यायाम कार्यक्षमता पुनर्संचयित करू शकतात आणि स्वातंत्र्य राखू शकतात. शक्ती आणि समन्वय एकत्रित करणाऱ्या हालचाली या उद्देशासाठी विशेषतः प्रभावी आहेत. डॉ. सिंग हे अगदी अचूकपणे सांगतात : आज आरोग्याला प्राधान्य दिल्याने उद्याचा काळ अधिक मजबूत होईल. या व्यायामांना तुमच्या दिनचर्येचा भाग बनवून, तुम्ही तुमच्या भविष्यातील स्वतःमध्ये गुंतवणूक करत आहात.

# रक्तदान करुन 'कास्ट्राईब' कडून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन





लातूर : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या वतीने आंबेडकर पार्क येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. तत्पूर्वी कास्ट्राईब शिक्षक संघटना जिल्हा शाखा लातूरच्या वतीने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. याचे उद्घाटन बीएसएनएलचे लातूर विभागाचे प्रमुख अनिल बनसोडे यांच्या हस्ते झाले. कास्ट्राईबच्या या शिबिरामध्ये ६१ रक्तदात्यांनी रक्तदान करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. या शिबिरास रक्तदात्यांनी व भीम सैनिकांनी भरभरून प्रतिसाद मिळाला.

याप्रसंगी शिक्षक आमदार विक्रम काळे, लसाकमचे नरसिंग घोडके जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक राजकुमार पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य सहदेव मस्के, लातूर कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष नितीन बनसोडे, जिल्हा सरचिटणीस अशोक माळगे, नागरत्न कांबळे, निलराज बनसोडे, कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे राज्य उपाध्यक्ष राहुल गायकवाड, अतिरिक्त सरचिटणीस महेश कांबळे, शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा कार्यक्रमाचे मुख्य संयोजक सुभाष मस्के, सचिव संजय राऊत, कोषाध्यक्ष सतीश मानकुस्कर, उपाध्यक्ष छगन घोडके, रेनापुर तालुका अध्यक्ष बाबासाहेब इंगळे, निलंगा तालुका अध्यक्ष तुळशीराम घोडके, लातूर तालुका अध्यक्ष विशाल जोगदंड, औसा तालुकाध्यक्ष राजकुमार गुंजरगे,माजी विस्तार अधिकारी डी.सी गायकवाड, श्री. सोनकांबळे, दिलीप गायकवाड, लातूर पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन बाबुराव बनसोडे, लातूर पतपेढीचे माजी चेअरमन विनायक सावंत, दिव्यांग विभागाचे गिरीश तुबाजी, रवी कुरील, सचिनभाऊ गंगावणे, रंजना चव्हाण, कास्ट्राईब शिक्षक संघटनेच्या महिला उपाध्यक्ष सरोजा भोसले मॅडम, शीलाताई उघाडे मॅडम, रंजीता गायकवाड, निवृत्त पीएसआय कचरू राऊत, किरणकुमार रायते, सुधीर बोकेफोडे यांच्यासह कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या संलग्न संघटनांचे पदाधिकारी व कर्मचाऱ्यांनी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी कार्यक्रम घेऊन सहभाग घेतला. विशेष बाब म्हणजे कास्ट्राईब दिव्यांग विभागाचे विभागीय अध्यक्ष गिरीश तुबाजी हे सकाळपासून शिबीर संपेपर्यंत कर्तव्यावर होते. रक्तदान स्थळी मार्गदर्शनपर कार्यक्रम घेण्यात आला. डॉ. आंबेडकर हे देशाला नाही तर जगाला लाभलेले अनमोल रत्न होते. त्यांच्या विचारांची जयंती सर्वांनी साजरी करावी, असे मत सुभाष मस्के यांनी व्यक्त केले. तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी शिक्षक बांधवांनी प्रयत्न करावेत, असे श्री. माळगे म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डी एस नरसिंगे यांनी तर आभार अशोक गायकवाड यांनी मानले.

# जुईनगर येथे भीम महोत्सव आयोजन

नवीमुंबई / प्रतिनिधी :- सालाबादप्रमाणे राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती महापालिका शाळा मैदान जुईनगर सेक्टर २३ ठिकाणी साजरी करण्यात येत आहे, बौध्दजन पंचायत समिती शाखा क्र ८२८ संघमित्रा महिला मंडळ यांच्या अधिपत्याखाली शनिवारी दि १९ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ६ ते १० वा. पर्यन्त धम्मपद हा समाजप्रबोधन कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून,प्रमुख उपस्थिती माजी कमिशनर,शिवसेना उपनेते सन्मा.विजय नाहटा साहेब उपस्थित राहणार आहेत,त्यांच्या हस्ते समाजातील समाजसेवक सन्मा.सुरेश काकडे,सन्मा.यशवंत शिंदे,सन्मा.अनिता नायडू,सन्मा.शशिकांत यादव यांना भीमरत्न २०२५ पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात येणार आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुनील शिर्के,सूर्यकांत सावन्त, यशवंत शिंदे,समीर साळवी,शिवदास सकपाळ,मिलिंद पवार मेहनत घेत आहेत. कार्यक्रमाला विभागातील जनतेने उपस्थित राहण्याचे आवाहन सचिव सिध्दार्थ साळवी यांनी केले आहे.

# केज येथे कृषी विद्यालय सुरू करा ; मराठवाडा जनता विकास परिषदेची मागणी

केज/प्रतिनिधी केज शहरालगत असलेल्या फलोत्पादन च्या जागेत अतिक्रमण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना केज शहरात कृषी विद्यालयाची गरज आहे. ग्रामीण भागात शेती हा मुख्य व्यवसाय आहे.कृषी शिक्षणानंतर आधुनिक तंत्रज्ञान शेतीसाठी या शिक्षितांचा उपयोग शेतीसाठी होणार आहे खेडेगावातील विद्यार्थ्यांसाठी कृषी विद्यालय अत्यावश्यक आहे फलोत्पादनच्या जागेत कृषी विद्यालय सुरू करण्यात यावे अशी मागणी मराठवाडा जनता विकास परिषद केज शाखेच्या वतीने करण्यात आली.केज तहसीलदार यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले आहे.

# क्रीडा गुण सवलतीचे प्रस्ताव १७ एप्रिल २०२५ पर्यंत सादर करावेत –

## जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे

लातूर :- शासन निर्णयानुसार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता दहावी) आणि उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता बारावी) देणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना तसेच एन.सी.सी., स्काऊट व गाइडमधील विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण दिले जातात. जिल्हा क्रीडा अधिकारी दरवर्षी क्रीडा सवलतीचे प्रस्ताव ३० एप्रिलपर्यंत विभागीय मंडळाकडे सादर करतात. मात्र, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता दहावी) आणि उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता बारावी) या परीक्षा नेहमीपेक्षा १० दिवस आधी घेण्यात आल्या असून, त्यांचे निकाल १५ मे २०२५ पर्यंत ऑनलाइन जाहीर केले जाणार आहेत. त्यामुळे क्रीडा गुण सवलतीचे प्रस्ताव १७ एप्रिल २०२५ पर्यंत 'आपले सरकार' पोर्टलद्वारे भरावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी केले आहे. १७ एप्रिल २०२५ नंतर कोणतेही नवीन प्रस्ताव शिफारशीसाठी स्वीकारले जाणार नाहीत, याची नोंद सर्व खेळाडू विद्यार्थी, पालक, क्रीडा शिक्षक आणि मुख्याध्यापक यांनी घ्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने मोफत नेत्र तपासणी व दंत चिकित्सा शिबिर.. रुग्णांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

मुरूम/ प्रतिनिधी :- भीम नगर, मुरूम, ता. उमरगा येथील सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहात रोटरी क्लब मुरूम सिटी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव समितीच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी व दंत चिकित्सा शिबिर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३४ व्या जयंतीचे औचित्य साधून बुधवारी (ता. १६) रोजी घेण्यात आले. धाराशिव येथील जे. एफ. अजमेरा रोटरी नेत्र रुग्णालयाचे नेत्र तज्ञ डॉ. शिवरुद्र इसाके, डॉ. सागर शिंदे, उमरगा येथील उपजिल्हा रुग्णालयाचे दंत चिकित्सक डॉ. शिवाजी मेनकुदळे, शल्यचिकित्सक डॉ. प्रभाकर बिचकाटे, कान नाक घसा तज्ञ डॉ. विजय जाधव, अक्षय भालेराव आदींनी रुग्णांची योग्यती तपासणी करून औषधोपचार केला. यावेळी रोटरीचे अध्यक्ष कमलाकर मोटे, सचिव सुनिल राठोड, डॉ. नितीन डागा, प्रा. डॉ. महेश मोटे, डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी, डॉ. महेश स्वामी, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक एम. एन. अर्दाले, वैद्यकीय अधिकारी डॉ. जी. एल. कांबळे, रवि भालेराव, संतोष थोरात, सुजित जाधव, विजयकुमार भोसले, रवि लोहार आदींची प्रमुख उपस्थिती होती. जयंती समितीचे संयोजक तथा अध्यक्ष प्रा. महेश कांबळे, उपाध्यक्ष आशिष नाईकवाडे, कोषाध्यक्ष संतोष कांबळे, सचिव प्रशांत गायकवाड, सहसचिव गौतम गायकवाड आदींनी पुढाकार घेतला. जयंती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सामाजिक बांधिलकी जपल्याबद्दल नागरिकांमधून कौतुक होत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या सामाजिक समतेचा संदेश कृतीत उतरण्याचा हा प्रयत्न असल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे. या शिबिरात २०० पेक्षा अधिक रुग्णांमध्ये जेष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांची काळजीपूर्वक तपासणी करण्यात आली. काही गरजू रुग्णांना पुढील उपचारासाठी विनामूल्य चष्मे आणि शस्त्रक्रियेची शिफारस करण्यात आली.




फोटो ओळ : मुरूम, ता. उमरगा येथील भीम नगरातील सार्वजनिक वाचनालयात आयोजित शिबिराप्रसंगी डॉक्टर रुग्णांची तपासणी करताना

# परभणी सुवर्णा , पीबीएनएस १८४ वाणांना देशपातळीवर क्षेत्रवाढीस मान्यता

परभणी / प्रतिनिधी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी येथील अखिल भारतीय समन्वित करडई संशोधन प्रकल्प विभागाने करडई संशोधनात सातत्याने उत्कृष्ट कार्य करत देशपातळीवर क्षेत्रवाढीस दोन नव्या करडई वाणांना अधिकृत मान्यता मिळवून दिली आहे. पीबीएनएस १५४ (परभणी सुवर्णा) व पीबीएनएस १८४ या वाणांना केंद्र सरकारच्या कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या केंद्रीय पीक गुणवत्ता, वाण अधिसूचना व प्रसारण समितीच्या बैठकीत मान्यता मिळाली आहे.

या वाणांना महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि तेलंगणा या राज्यांमध्ये (झोन-१) लागवडीसाठी शिफारस करण्यात आली असून, पीबीएनएस १८४ वाणाला झोन-२ अंतर्गत इतर प्रमुख करडई उत्पादक राज्यांमध्येही लागवडीसाठी मान्यता देण्यात आली आहे. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. इन्द्र मणि यांच्या मार्गदर्शनाखाली, संशोधन संचालक डॉ. खिजर बेग, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. हिराकांत काळपांडे तसेच विद्यापीठ प्रशासनाच्या सहकार्याने हे यश प्राप्त झाले आहे. कुलगुरूंनी सहभागी शास्त्रज्ञांचे अभिनंदन करताना सांगितले की, या वाणांमुळे शेतक-यांना अधिक उत्पादनक्षम व गुणवत्तापूर्ण करडई वाण मिळतील. ज्यामुळे त्यांच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ होईल असे सांगितले.

# लातूर व ठाणे जिल्ह्यातून चोरी केलेल्या दोन मोटारसायकली, दोन ऑटोसह दोन आरोपीला अटक. स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी.



लातूर :- लातूर व ठाणे जिल्ह्यातून चोरी केलेल्या दोन मोटारसायकली, दोन ऑटोसह दोन आरोपीला अटक. ०३ गुन्हे उघड. स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी.*

या बाबत थोडक्यात हकीकत अशी की,पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांचे आदेशान्वये अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशनला घडलेले मालाविषयक गुन्हे उघडकीस आणण्याकरिता पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सूचना व मार्गदर्शन करण्यात आले होते.

पोलीस स्टेशनला दाखल असलेल्या विशेषतः मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरिता विशेष पथके स्थापन करून गुन्हे उघड करण्याचे प्रयत्न सुरू होते .

त्या अनुषंगाने सदर पथके माहितीचे संकलन करीत असताना, माहिती घेत असताना दिनांक १४/०४/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला माहिती मिळाली की, मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यातील ओम हनुमंत कांबळे त्याने चोरलेल्या मोटारसायकली व रियर ऑटो त्याचे गौर पाटी तालुका निलंगा येथील राहते घरासमोर लपवून ठेवलेल्या आहेत.अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने दिनांक १४/०४/२०२५ रोजी सदर पथक तात्काळ निलंगा तालुक्यातील गौर पाटी येथे पोचून घरासमोर थांबलेल्या ओम कांबळे याला ताब्यात घेऊन त्याने लपवून ठेवलेल्या मोटार सायकल व ऑटो संदर्भाने विचारपूस केली असता सांगितले कि, तो व त्याचा आणखीन एक साथीदार असे मिळून सदरचे ऑटो पोलीस ठाणे शिवाजीनगर येथून एक तर ठाणे जिल्ह्यातून एक व पोलीस ठाणे गांधी चौक हद्दीतून दोन मोटरसायकली चोरी केल्याचे सांगितले. त्यावरून नमूद आरोपीकडून त्याने चोरलेल्या मोटरसायकल व ऑटो च्या चेसेस इंजिन क्रमांक वरून ऑटो चोरीचा एक गुन्हा पोलीस ठाणे शिवाजीनगर व एक ठाणे जिल्ह्यातील महात्मा फुले चौक पोलीस ठाणे येथे दाखल असून गांधी चौक येथे एक मोटर सायकल चोरीचा गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे. दोन मोटारसायकल व दोन ऑटो ज्याची किंमत ०२ लाख १० हजार रुपये असा असून त्या जप्त करण्यात आले आहेत.

आरोपी नामे

१)ओम हनुमंत कांबळे, वय २३ वर्ष, राहणार गौर पाटी तालुका निलंगा.

२) रोहित विष्णू क्षीरसागर, वय २२ वर्ष, राहणार येळवट पाटी, किल्लारी तालुका औसा.

यांना त्यांचे राहते ठिकाणाहून दिनांक १४ एप्रिल रोजी दुपारी ०५:३० वाजता ताब्यात घेण्यात आले आहे.

नमूद आरोपींना पोलीस ठाणे शिवाजीनगर येथे पुढील कार्यवाहीस्तव ताब्यात देण्यात आले असून संबंधित पोलीस ठाणेचे पोलीस पुढील तपास करीत आहेत.

सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक राजाभाऊ घाडगे यांच्या नेतृत्वातील पथका मधील पोलीस अंमलदार माधव बिलापट्टे, नवनाथ हासबे, तुराब पठाण, राजेश कंचे, गणेश साठे, प्रदीप स्वामी, पुट्ठेवाड, नकुल पाटील यांनी पार पाडली.

# भाजपचा मास्टरस्ट्रोक! 'या' मोठ्या नेत्याचे घर फोडत पक्षाला पाडली खिंडार



मुंबई : राजकीय वर्तुळातून एक मोठी बातमी समोर आली आहे. गेल्या दोन अडीच महिन्यांत भाजपमध्ये अनेक पक्ष प्रवेश झाले. राज्यात सरकार आल्यानंतर सत्तेचा फायदा घेऊन भाजपमध्ये जोरदार इन्कमिंग सुरू झाले. यादरम्यान भाजपने अनेक मोठे नेते गळाला लावले. एखादा नेते फुटत नसला तर भाजपने त्या बड्या नेत्याचा चुलता, त्याचा भाऊ यांनाच पक्षात घेण्याचे सत्र सुरु केले आहे. जयंत पाटलांना मोठा धक्का शतप्रतिशत भाजप म्हणणाऱ्या भाजपने आता शेतकरी कामगार पक्षाचे नेते जयंत पाटील यांच्या घरातच पाऊल ठेवत शेकापला खिंडार पाडले आहे.जयंत पाटील यांचे बंधू पंडित पाटील आणि भाचे आस्वाद पाटील यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. भाजप प्रदेश कार्यालयात हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा पक्षप्रवेश महत्त्वाचा मानला जात आहे. हे पण वाचा : राज ठाकरेंचा पक्ष दिल्लीच्या ऑक्सिजनशिवाय जगू शकत नाही कोण आहेत पंडित पाटील? पंडित पाटील हे शेकापचे माजी आमदार रायगड जिल्हा बँकेचे अध्यक्ष जयंत पाटील यांचे धाकटे बंधू आहेत. अलिबाग विधानसभा मतदारसंघातून २०१४ साली त्यांनी शेकापकडून विधानसभा निवडणूक लढवली होती. अलिबाग विधानसभेवर त्यांनी शेकापचा झेंडा फडकवला होता. रायगड जिल्ह्यामध्ये शेकापचा मोठा दबदबा आहे. प्रत्येक निवडणुकीत शेकापची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची ठरते भाजपने कोणत्या नेत्यांना दिला पक्षात प्रवेश? मागच्या दोन दिवसात कागलचे माजी आमदार संजय घाडगे, शहापूरचे माजी आमदार पांडुरंग बरोरा, काँग्रेस नेते प्रसाद हिरे, फलटणचे माजी नगराध्यक्ष दिलीपसिंह भोसले, माजी नगरसेविका मधुबाला भोसले, दिलीप सिंह भोसले यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे.

सध्या भाजपमध्ये होणारे इनकमिंग बघून विरोधकांना मोठा धक्का बसला आहे.

# १८ एप्रिल रोजी गुडफ्रायडेनिमित्त विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे बाह्यरुग्ण विभाग (ओ.पी.डी) बंद राहणार

लातूर :- शुक्रवार, १८ एप्रिल, २०२५ रोजी गुडफ्रायडेनिमित्त शासकीय सुट्टी असल्यामुळे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग बंद राहील. तसेच शनिवार, १९ एप्रिल, २०२५ रोजी पासून बाह्यरुग्ण विभाग (ओ. पी.डी.) नियमित वेळेप्रमाणे सुरु राहील, असे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन जाधव यांनी कळविले आहे.

# गप्पेवाडी-नामेवाडी येथील मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत केलेले काम निकृष्ट दर्जेचे-शिवाजी केदार




केज/ प्रतिनिधी केज तालुक्यातील गप्पेवाडी नामेवाडी येथील मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत केलेले काम हे निकृष्ट दर्जेचे असल्याची लेखी तक्रार शिवाजी केदार यांनी तहसीलदार केज यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्यातील गप्पेवाडी नामेवाडी येथील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत रस्त्याचे काम हे निकृष्ट दर्जाचे झालेले आहे. सदर काम हे मे. कंट्रक्शन कंपनी, केज यांनी केलेले आहे. सदरील रस्ता बनवताना अगोदर बी.बी.एम. करणे गरजेचे होते परंतु सदर कंपनीने स्वतःच्या फायद्यासाठी हे काम निकृष्ट दर्जाचे केलेले असल्यामुळे या कामाचे बिल अदा करण्यात येऊ नये, तात्काळ एक उच्चस्तरीय समिती गठीत करून सदर कामाची सखोल चौकशी करून संबंधितांवर तात्काळ योग्य ती कारवाई करण्यात यावी, सदर काम हे अंदाज पत्रकानुसार करण्यात यावे, रस्त्याचे काम चालू असताना सदरचे काम हे निकृष्ट दर्जाचे आमच्या निदर्शनास येताच आम्ही ग्रामस्थांनी सदर कंपनीचे गुत्तेदार यांच्या मोबाईल दूरध्वनी क्र.९९२१९९८४४४ या नंबर वर संपर्क साधला असता त्यांनी आम्हाला असे सांगितले की, तुमच्या रस्त्याचे काम हे चांगल्या प्रकारचे होत आहे. आम्ही म्हणालो की, आमच्या गावच्या रस्त्याचे काम चांगल्या क्वालिटीचे करा असे बोललो असता. सदर कंपनीचे गुत्तेदार हे असे म्हणाले की, आम्ही अंदाज पत्रकानुसारच काम करत आहोत. सदर काम हे उत्कृष्ट दर्जाचे होत आहे, त्यावर शिवाजी केदार असे म्हणाले की, सदर रस्त्यावरून बैलगाडी गेली असता रस्ता उघडत आहे. तेव्हा गुतेदाराने असे उत्तर दिले की, सदर काम हे जास्त जाडीचे झाल्यामुळे उखडत आहे. आज रोजी देखील सदर रस्त्याचे काम हे हाताने उखडून निघत आहे. सदर कामाची चौकशी करण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती गठीत करून चौकशी करून संबंधितांवर योग्य ती कारवाई करून सदर कंट्रक्शन कंपनीचे नाव काळ्या यादीत टाकण्यात यावे. चौकशी करून संबंधितांवर गुन्हे दाखल न केल्यास आम्ही तहसील कार्यालयाच्या समोर आमरण उपोषण करणार असे लेखी निवेदनात शिवाजी केदार यांनी म्हटले आहे. सदर निवेदनाच्या प्रती तहसीलदार केज, जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय बीड, उपअभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग केज, पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे केज यांना दिल्या आहेत.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE